# महासुरक्षा पत्रिका

## राष्ट्रीय सुरक्षा परिषद

महाराष्ट्र चॅप्टर

NATIONAL SAFETY COUNCIL

MAHARASHTRA CHAPTER

मुखपत्र




संपादक
श्री. द. ल. मस्कीकर

वर्ष २ रे अंक ७ वा | जानेवारी - मार्च २०१० | सभासदांसाठी विनामूल्य


## अध्यक्षांचे मनोगत



वाचक मित्रांनो,

राष्ट्रीय सुरक्षा दिवस, अग्निशमन सेवा दिवस, जागतिक सुरक्षा व स्वास्थ दिवस आणि जागतिक पर्यावरण दिवस अशा महत्वाच्या समारंभाचा मार्च ते जून असा हा सुरक्षे संबधीचाच 'चातुर्मास' आहे असे म्हणता येईल. आणि चातुर्मासात कुठल्या तरी चांगल्या व्रताचा अंगिकार करावा लागतो हे सुद्धा विसरुन चालणार नाही.

सुमारे एक वर्षापूर्वी म्हणजे फेब्रुवारी २००९ मध्ये झालेल्या ४२ व्या राष्ट्रीय श्रम परिषदेत भारताचे सुरक्षा, स्वास्थ्य व कार्य-पर्यावरण विषयक राष्ट्रीय धोरण जाहीर करण्यात आले. मात्र ते किती संबंधित लोकांपर्यत पोहचले हे कळू शकत नाही. एक मात्र निश्चित की सामान्य जनांपर्यत, तळागळातल्या श्रमिकां पर्यंत तर ते पोहोचणारच नाही.

सामान्य जनता, असंघटित श्रमिक, छोट्या उद्योगात व कुटिरोद्योगात काम करणारे श्रमिक या सर्वांना आज सुरक्षा स्वास्थ व किमान सुसह्य पर्यावरण या विषयी समजाऊन सांगण्याची गरज आहे. आहोत आपण त्यासाठी तयार ? शिक्षण-प्रशिक्षण, कार्यशाळा-चर्चासत्रे, परिषदा हे आपले कार्यक्रम आज निवडक नऊ टक्के गटा पर्यंतच भिडतात. उरलेल्या बहुसंख्य, सामान्य, असंघटित, अकुशल, छोटी कामे करणाऱ्या या तळागाळातील श्रमिकांचा कोण विचार करणार ? ह्या खऱ्याखुऱ्या झोपलेल्यांना जागे केल्यास ते निश्चित खडबडून जागे होतील, सुरक्षा व आरोग्य विषयक मूलभूत गोष्टींची मागणी करतील व अंगिकार ही करतील त्यांचा ! म्हणून, या निवडक नऊ टक्के गटाच्या केवळ झोपेचे सोंग घेतलेल्यांना जागविण्याचा दिखाऊ प्रयत्न करण्यापेक्षा या खरोखरीच झोपलेल्यांना जागे करण्यासाठी त्यांचाकडे आपले प्रयत्न व कार्यक्रम वळवावे लागतील.

'सुरक्षा काय असते बुवा ? 'ही सेफ्टी कौंसिल काय ? 'कधी अन् कशासाठी हा सेफ्टी डे ?' असे प्रश्न जेव्हा जनसामान्य विचारतात तेव्हा आपल्या भुवया चकितपणे उंचावतात. यात त्यांचा काय दोष ? त्यांना हे प्रश्न पडणारचं !

आजवर आपण त्यांचाशी कधी जवळीक व संवाद साधण्याचा प्रयत्न केला काय ? तुम्हाला नॅशनल सेफ्टी काउन्सिलच्या स्तरावरुन असे प्रयत्न करणे आवश्यक आहे. तसेच यासाठी रोटरीक्लब, लायन्सक्लब, कामगार संघटना, उद्योगपतींच्या संघटना या साऱ्यांनी सुरक्षा परिषदेला (नॅशनल सेफ्टी काउन्सिलला) साह्य करावे ही रास्त अपेक्षा आहे.

भारताच्या सुरक्षा-स्वास्थ-कार्यपर्यावरण विषयीच्या राष्ट्रीय धोरणाच्या प्रास्ताविकातच जाहीर केले आहे की ''सुरक्षित व स्वास्थ्यदायी कार्य-पर्यावरण हा मूलभूत मानवी अधिकार असून सामाजिक न्यायाची पूर्तता या अधिकाराच्या साफल्यानेच होईल. त्यामुळे सुरक्षेबाबत लोक-शिक्षण व लोक-जागृती या गोष्टी प्राधान्याने कराव्या लागतील. तसेच, एखाद्याला त्याच्या आर्थिक गरजेची पूर्तता करण्यासाठी त्याच्या वयाला व प्रकृतीला झेपणार नाही अशा कामाला जुंपून पशूवत वागऊ नये.'' हा केवळ राष्ट्रीय विचार नसून मानवतेचा आधार आहे. आपण या दुर्लक्षित वर्गा पर्यंत जाऊन त्यांना शिकविणार, समजविणार व करणार त्यांना तयार ?

मृतप्राणी जमा करुन त्यांची विल्हेवाट लावणारे, कचरा काढणारे व जमा करणारे, मैला वाहणारे, भंगार जमा करणारे, रस्ता खोदणारे, रेती-खडी वाहणारे, हातमाग, यंत्रमाग यावर मान मोडून व अत्यंत असुरक्षित व अनारोग्य-मय वातावरणात काम करणारे, दऱ्या-सतरंज्या विणणारे असे असंख्य श्रमिक दुर्लक्षित राहीले आहेत. त्यांच्या पर्यंत त्यांना हवी असलेली माहिती साध्या, सोप्या व सुबोध बोलीतून, माध्यमातून पोहोचवू या !

मी सुरुवातीलांच ज्या चातुर्मासातील व्रताचा उल्लेख केला ते व्रत म्हणजे लोक-शिक्षण व लोक-जागृतीचे व्रत.

**अरविंद रा. दोशी**
अध्यक्ष, राष्ट्रीय सुरक्षा परिषद, महाराष्ट्र चॅप्टर

# सुरक्षित वर्तणूक

सुरक्षित वर्तणूक ही चांगल्या विचारांची व दृष्टिकोनाची निर्मिती असते. आपल्या महाराष्ट्रातील साधू-संतानी सुरक्षित वागण्याविषयी अनुभवाचे बोल लिहून ठेवून आहेत त्याचा आपण इथे विचार करणार आहोत.

समर्थ रामदास म्हणतात :

**'वाट पुसल्याविण जाऊ नये।**
**फळ वोळखल्याविण खाऊ नये ।**
**पडिली वस्तू घेऊ नये । येका येकी।।**

निश्चित मार्ग विचारुनच पुढे चला. अपरिचित फळ व खाद्य पदार्थ खाऊ नका. वाटेत एखादी वस्तू पडलेली दिसल्यास ती उचलू नका.

आजकाल आतंकवादी कारवायांमुळे लोक अशा वस्तूंना हात लावत नाही. परन्तु कटु अनुभवांनंतरच आपण हे शिकलो, समर्थांनी मात्र ४०० वर्षांपूर्वीच ही चेतावणी देऊन ठेवली आहे. पण तिकडे लक्ष कोण देतो?

समर्थ पुढे, असेही म्हणतातः

**'रात्री पथ क्रमू नये । येका येकी'**

म्हणजे रात्री-बेरात्री एकट्याने प्रवासास निघणे सुद्धा धोक्याचे आहे.

**'अंधारी हात घालू नये । दुश्चित्तपणे विसरु नये। वस्तु आपुला'.**

अंधारात एखादी वस्तू शोधणे वा काम करणे अयोग्य असून आपल्याला जी गोष्टी आवश्यक आहे - म्हणजे आपली सुरक्षा ती अनाव धानाने सुद्धा विसरु नका.

समर्थ आणखी सांगतातः

**'अवगुण सोडिता जाती । उत्तम गुण अभ्यासिता येती ।**
**कुविद्या सांडून शिकती । शहाणे विद्या'**

वाईट म्हणजेच असुरक्षित व आरोग्याला घातक सवयी सोडल्या तरच चांगल्या म्हणजेच सुरक्षित व निरोगी सवयी अंगी येतात, त्या आपण शिकू शकतो. चुकीच्या व निरर्थक माहितीच्या त्याग करुनच चांगले ज्ञान ग्रहण करण्याचा शहाणी माणसे प्रयत्न करतात.

स्वानुभवाने व स्वप्रयत्नाने काम करण्याचे महत्व सांगताना समर्थ म्हणतातः

**'जो दुसऱ्यावरी विश्वासला । तयाचा कार्यभाग बुडाला।**
**जो आपणाचि कष्टात गेला। तोचि भला'**

स्वानुभवाने खात्री करुन घ्यावी.निव्वळ दुसऱ्यावर विश्वासून काम करणाऱ्याचे कार्य तडीस जात नाही. त्यासाठी स्वतःश्रमण्याची ज्यांची तयारी तेच खरे!

सुरक्षा केवळ पोपटपंची करुन व इतरांना शिकवून प्रत्यक्षात येणारी गोष्ट नाही तर ती वस्तुतः आचरणात आणण्याची गोष्ट आहे. वरीष्ठ मंडळी सुरक्षा स्वतः पाळूनच इतरांना शिकवू शकतील. त्यांना कनिष्ठां समोर आपल्या सुरक्षित वर्तनाचे उदाहरण ठेवावे लागेल. या सांगण्याला पुष्टी देण्यासाठी समर्थ म्हणतातः

**'बोलण्या सारखे चालणे । स्वये करुन बोलणे ।**
**तयाची वचने प्रमाणे । मानिती जनी**

उक्ती पेक्षा कृतीतूनच सुरक्षा सांगावी. अन्यथा,

**'क्रिये विण शब्द ज्ञान । तेचि श्वानाचे वमन'**

या समर्थ वचनाचा प्रत्यय येईल.

केवळ कष्टाने च कार्य-सिद्धी होत नाही व सुख-समाधान लाभत नाही तर कष्टांना सावधानतेची म्हणजे सुरक्षितपणे काम करण्याची जोड देणेच उचित ठरते. म्हणून, समर्थ म्हणतात :

**'अंतरी नाही सावधानता ।**
**येल ठाकेना पुरता ।**
**सुख-संतोषाची वार्ता । तेथे कैची'**

**जयसिंह सोळंकी**
कार्यकारी समिती सभासद



४ मार्च २०१० राष्ट्रीय सुरक्षितता दिना निमित्त, सेंट्रल रेल्वे कॅरेज वर्कशॉप, माटूंगा येथील कर्मचारी सुरक्षिततेची शपथ घेताना



सुरक्षितता सप्ताहानिमित्त, राष्ट्रीय सुरक्षितता परिषद-महाराष्ट्र विभागातर्फे अे. एस. करमरकर, उपमुख्य सुरक्षा अधिकारी, आर.सी.एफ. लि. ट्रॉम्बे, हे सेंट्रल रेल्वे कॅरेज माटूंगा वर्कशॉपच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना 'मटेरियल हॅण्डलिंग' या विषयाबाबत माहिती देताना.



192nd Training Course in Industrial Safety in collaboration with Central Labour Institute – Safety Division Mumbai on 6th-8th April 2010

## CBI (Causes Behind an Incident)

***Incident in Brief:***

In one of the reputed refinery fire took place in High Vacuum Unit (HVU) when Hydrocarbon (HC) backed up into steam hose, having a hole, connected to Heat Exchanger (HE) for its steam flushing. There was no casualty but significant damage to electrical equipment and instrumentation. This caused unit outage for 3-4 weeks to carryout repair operations.

***Sequence of Event:***

- Few weeks before the incident the HE was taken out for its tube leak repairs.
- To facilitate repairs a Halogen lamp (not as per requirement of electrical standard–area classification) was provided. The same left as it is at the site.
- This HE after repairs put back into service which once again developed leak after few weeks.
- The repairs involved line-up of HE with HE A/B to flushing oil return (FOR), which is pressurized with Medium Pressure (MP) steam.
- Although it was known that hose has hole in it, still it was used.
- The design of the flushing oil supply and return system allowed backflow to occur from the FOR to HE when FOR system was pressurized due to flushing operation in adjacent HVU unit.
- Procedure of notification of back flushing operation and stopping of steaming operation was not executed.
- Hot gas flowed back through the FOR connection, through HE, into steam hose connected to HE A/B.
- The hot gas escaped from the leaky steam hose and ignited.
- The probable source of ignition is either any of the ad jacent hot surface or the non standard halogen lamp provided over there.
- Fire alarm got actuated. Both HAV units were shutdown. Fuel (hot oil) supply was stopped and foam applied to extinguish the fire.




***CBI (Causes Behind an Incident):***

1. The steam hose used should be replaced with the healthy one. Inspection as a part of investigation noticed one more hose in similar bad condition – indicates laps in MI (Mechanical Integrity) systems.
2. Installation of non-flameproof flood lamp in the classified area–indicates lapse in implementation of Operating Procedures.
3. The design of flushing oil supply and return system allowed backflow to occur. Only barrier exist was the procedure barrier to prevent back flow which was not followed – indicates lapse in implementation of the Operating Procedures.

***CBI (Caution Before an Incident):***

1. Ensure that the system exists for inspection of the hoses prior to its use & if required replace them.
2. Audit process should include hose inspection process to ensure effectiveness of this process.
3. If the backflow scenario, as explained, exists - try to eliminate.
4. If the same can't be eliminated then don't just rely on the procedural barriers but also put additional barriers viz. NRV (Non Return Valve), positive isolation valve.
5. If steam hose is connected to live HC system, then management of change procedure should be followed to verify and prevent backflow into steam system.

**-- D. S. PANDE**

## प्लास्टीकचे प्रदुषण व त्याचा सुरक्षित वापर

आज जर आपण इकडे तिकडे नजर फिरवली तर आपणास सर्वत्र वस्तुच्या स्वरुपात प्लास्टीकचाच उपयोग/वापर होत असल्याचे आढळून येईल व त्याच बरोबर सर्वत्र दिवसेंदिवस प्लास्टीकचा कचराही वाढताना दिसून येईल. पाण्याचा बाटल्या, खाद्दपदार्थांचे पॅकिंग्स, जेवणाचे डब्बे, किचनमधील ऊपकरणे, प्लास्टीक बादल्या, चपला-बुट्स, विविधप्रकारच्या पिशव्या या व अनेक इतर गोष्टींमध्ये प्लास्टीकचा अधिकप्रमाणात वापर होत आहे. एकंदरीत आपण प्लास्टीकच्या जंगलातच वावरायला लागलो आहोत. प्लास्टीकच्या अती प्रमाणात वापराला कारण म्हणजे प्लास्टीक, मुबलक, स्वस्त, हव्यात्या गोष्टीसाठी सहजपणे उपलब्ध होते. सोयीस्कर म्हणून आपण जादातर प्लास्टीकच्याच वस्तू वापरतो. त्यामुळे प्लास्टीक आपला जवळचा साथीदार बनला आहे.

जरी आपल्याला प्लास्टीक हे त्याच्या गूणांमुळे हवेहवेसे वाटत असेल तरी त्याची दुसरी दुर्गूण बाजू इतकी भयानक आहे की एक दिवस आपण या प्लास्टीकच्या जंगलातच गाडले जाऊ. कारण प्लास्टीक हे नाश पावत नाही त्याचे विघटन होत नाही. त्यामुळे प्लास्टीकचा टाकाऊ कचरा दिवसेंदिवस वाढतच चालला आहे. त्याने अनेक गटारे बंद केली आहेत. हेच टाकाऊ प्लास्टीक प्राण्यांच्या पोटात गेल्याने कित्येक प्राणी दगावले आहेत. प्लास्टीक पिशव्यांबरोबर खेळताना मुले गुदमरुन मृत्यू होण्याचेही प्रसंग ओढावलेले आहेत. विषारी पदार्थांच्या प्लास्टीक पिशव्यांचा पूनर्वापर केल्याने अनेकांना विषबाधाही होऊ शकते. अशा व अनेक प्रकारे प्लास्टीकमुळे आपले सभोवतालचे पर्यावरण धोक्यात येत आहे. हे सर्व धोके लक्षात घेतल्यानंतर आपण खरोखरच प्लास्टीकचा वापर कमीतकमी करावा. पुनर्वापरही नियमानूसारच करायला हवा.

.............पुढील पानावर

........मागील पानावरुन

खरेतर प्लास्टीकच्या पर्यायी साधनांचाच वापर करणे ही आजच्या काळाची गरज आहे.

प्लास्टीकचे पर्यावरणावर होणारे विपरीत परिणाम कमी करण्यासाठी व त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भारत सरकारने ''प्लास्टीकचा पुनर्वापर'' उत्पादन व वापर अधिनीयम १९९९ हा अमंलात आणला आहे. प्लास्टीकचा पर्यावरणावर विपरित परिणाम होऊ नये म्हणून बऱ्याच काही गोष्टी आपण करु शकतो.

**उदाहरणार्थ**

१. ग्राहकांनी तसेच विक्रेत्यांनी प्लास्टीकच्या पिशव्या वापरण्याचे टाळावे. त्याऐवजी कापडी अथवा कागदी पिशव्या वापराव्यात.
२. प्लास्टीकच्या कचऱ्याची विल्हेवाट योग्य प्रकारे करावी. प्रदुषणरहीत भट्टीमध्ये प्लास्टीक जाळून नष्ट करता येते.
३. डांबरी रोड बनविण्यामध्ये सुद्धा प्लास्टीकचा वापर करता येतो.
४. प्लास्टीक जर वापरलेच तर ते २० मायक्रॉन पेक्षा अधिक जाडीचे वापरावे.
५. प्लास्टीक जर वापरत असाल तर ते रंगहिन वापरा.
६. प्लास्टीकचा पुनर्रवापर हा IS - १४५३४ : १९९८ नूसारच करावा.
७. विषारी पदार्थाची पॅकींग करण्यासाठी वापरण्यात आलेले प्लास्टीक पुनर्रवापरात येणार नाही याची खात्री करा.
८. सर्व लोकांमध्ये प्लास्टीकच्या दूष्परीणामांबद्दल जागरुकता निर्माण करायला हवी.
९. विद्यार्थ्यांना शालेय जीवनातूनच प्लास्टीकच्या आरोग्य विघातक परिणामांबद्दल जागरुकता निर्माण करायला हवी.
१०. आपण सर्वांनी स्वतःची नैतीक जबाबदारी समजून प्लास्टीकचा वापर शक्यतो टाळावा व तसा मनाशी ठाम निश्चय करावा.

**-- बाजीराव देठे**
सुरक्षा स्वास्थ्य पर्यावरण विभाग, ग्लेनमार्क जेनेरिक्स लि.

## ४ मार्च २०१०, राष्ट्रीय सुरक्षितता दिन/सप्ताह






(डावीकडे) बृहन्मुंबई महानगर पालिका भांडूप संकुल जलशुद्धीकरण केंद्रातील अधिकारी, राष्ट्रीय सुरक्षितता दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सुरक्षिततेची शपथ घेताना. (उजवीकडे) भांडूप संकुलातील कर्मचारी प्रथमोपचाराबाबतीतील प्रात्यक्षिके सादर करताना.






(डावीकडे) बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातर्फे या वर्षी प्रथमच सुरक्षितता दिन साजरा केला गेला, त्यावेळी या दिनाचे महत्व सांगताना सुरक्षितता अधिकारी श्री. प्र.र. मसुरकर व इतर अधिकारी. (उजवीकडे) घनकचरा व्यवस्थापनातर्फे आयोजित दत्तक वस्ती स्वच्छता अभियानाचे स्वयंसेवक सुरक्षिततेची शपथ घेताना.






(डावीकडे) राष्ट्रीय केमिकल फर्टीलायझर्स (आरसीएफ), थळ तर्फे सुरक्षितता दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात आरसीएफ, थळ येथील वरीष्ठ अधिकारी. (उजवीकडे) आरसीएफ, थळ येथील अधिकारी व कर्मचारी सुरक्षिततेची शपथ घेताना

# ४ मार्च २०१०, राष्ट्रीय सुरक्षितता दिन/सप्ताह




(डावीकडे) टाटा थर्मल पॉवर स्टेशन ट्रॉम्बे तर्फे राष्ट्रीय सुरक्षितता दिन साजरा करण्यात आला, त्यावेळेस टाटा थर्मल पॉवर स्टेशनचे उपाध्यक्ष श्री अशोक सेठी कार्यक्रमाचे उद्घाटन करताना. (उजवीकडे) टाटा थर्मल पॉवर स्टेशनचे वरीष्ठ अधिकारी सुरक्षिततेची शपथ घेताना.




(डावीकडे) एल.जी. इलेक्ट्रॉनिक इंडिया लिमिटेड, पुणे येथील अधिकारी व कर्मचारी सुरक्षिततेची शपथ घेताना. (उजवीकडे) एल.जी. इलेक्ट्रॉनिक इंडिया लिमिटेड, पुणे यांनी गावातील शालेय विद्यार्थ्यांसाठी सुरक्षितता आरोग्य व पर्यावरण या विषयावर चित्रकला स्पर्धा आयोजित केली होती, त्यावेळेस विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक देताना.




आसीएफ लि., ट्रॉम्बे येथे १० मार्च २०१० रोजी राष्ट्रीय सुरक्षितता सप्ताहानिमित्त ''ट्रॉम्बे सुरक्षा'' पत्रिकेचे प्रकाशन करताना (डावीकडून) श्री आर के जैन (ई. डी. आसीएफ लि., ट्रॉम्बे, श्री. सी.पी.पासेबंध (सहसंचालक, औ.सुरक्षा व आरोग्य, महाराष्ट्र शासन), श्री यु.एस. झा (सीएमडी), श्री मनोज प्रिया (संचालक, तांत्रिकी), श्री आर.बी. पोरे (उपसंचालक, औ.सुरक्षा व आरोग्य, महाराष्ट्र शासन) (उजवीकडे) राष्ट्रीय सुरक्षितता दिनानिमित्त ४ मार्च २०१० रोजी श्री मनोज प्रिया (संचालक, तांत्रिकी-आरसीएफ, ट्रॉम्बे) ध्वजारोहण करताना, त्यावेळेस आरसीएफ लि., ट्रॉम्बे येथील वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## ARTICLES & SUGGESTIONS

Members are requested to forward their articles in Marathi, Hindi & English on the theme connected with health, safety and environment for publishing the same in the forthcoming issue of the newsletter, at least 30 days in advance of previous month of issue.


**Advertise in 'Mahasurksha Patrika' and derive BIG benefits**

(Mahasuraksha Patrika reaches over 2000 members from all over Maharashtra)

**ADVERTISEMENT TARIFF**

| Position | Single Insertion | Position | Single Insertion |
|---|---|---|---|
| Full Page | Rs.5,000/- | Half Page | Rs.3,000/- |
| Quarter Page | Rs.1,500/- | | |

Note: Positive/artwork or CD accepted upto 15th day of previous month of issue

## NSC-MC UNDERTAKES

Safety Audits, Energy Conservation, Inhouse Training Programmes & other Safety related assignments.

Please write to:

**The Hon. Secretary**

**NATIONAL SAFETY COUNCIL-MAHARASHTRA CHAPTER**

5/48, Tardeo A.C. Market Bldg., Tardeo Road, Mumbai 400034.

Telefax: 022-2352 3042 Email: nscmc@mtnl.net.in



**EDITORIAL BOARD: Mr. D.L. Maskikar** (Chief Editor), **Mr. A.A. Raichur, Mr. P.R. Masurkar, Mr. J.A. Solanki, Mr. M. Kant.** Price Rs.20/- for non members. Edited and Published by: D.L.Maskikar, Vice Chairman on behalf of National Safety Council-Maharashtra Chapter, 5/48, Tardeo A.C. Market Building, Tardeo Raod, Mumbai 400 034. Telefax: 022-2352 3042, Email: nscmc@mtnl.net.in and Printed by GOPALE TRADERS, 13/21, Mapla House, #15, Chana Street, Fort, Mumbai - 400 001. *The views expressed by the authors of the articles published are their own and NSC-MC does not assume any responsibility for the same.*

# No Matter Where You Work, You Are In Safe Hands



**Distributors for:**

PIERCAN

SPERIAN
Protection you can trust

NITREX™
Performance Beyond Expectation

SAPHYMO

Honeywell

Bata Industrials®
FOOTWEAR BEYOND SAFETY

ora

WOODLAND
EXPLORE MORE

Safety Umbrella
A division of safety services, Mumbai

**Office:** A-5, Rajniketan Building, Opp. Mahindra Garden, S. V. Road, Goregaon (W), Mumbai 400 062.
Tel: +91 22 2872 2627 / 2876 4542 Fax: +91 22 2872 4831
E mail: safetyumbrella@gmail.com Website: http://www.dandsafety.com

**Works:** 105, Rajprabha Landmark Industrial Estate, Bldg No. 4, Bhoidapada, Sativali Road, Vasai (E), Dist Thane 401 208

**Manufacturers, Indenters, Importers and Exporters of Personal Protective Equipments**